# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-27.05.2026** **वार- बुधवार**

---

**आषाढी एकादशी**

आषाढी एकादशी यंदा 25 जुलै रोजी साजरी होणार असून पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रूक्मिणीची शासकीय महापूजा पार पडणार आहे. 15 ते 29 जुलैदरम्यान आषाढी यात्रा होणार असून 16 जुलैपासून भाविकांसाठी 24 तास दर्शन व्यवस्था सुरू करण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान सुरक्षा, स्वच्छता, निवास आणि दर्शनरांग नियोजनावर विशेष भर देण्यात येणार आहे.

**एसआयआर**

SIR अर्थात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाने आज शिक्कामोर्तब केलं. गेल्यावर्षी बिहारमधे पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्यासाठी काढलेल्या अधिसूचनेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली, त्यावेळी न्यायालयाने हा निर्णय दिला. जन प्रतिनिधीत्व कायदा 1950 च्या कलम 324 नुसार निवडणूक आयोगाला पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्याचा अधिकार आहे, याद्वारे राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वाचं पालन होतं, असं न्यायालयानं सांगितलं.

SIR ला कायदेशीर मान्यता आहे, त्यामुळे इतर पुनरीक्षणापेक्षा SIR ची प्रक्रिया वेगळी आहे एवढ्याच कारणामुळे ते अवैध ठरत नाही, तसंच निवडणूक आयोगाने अधिकारांचं उल्लंघन केलं असाही त्याचा अर्थ होत नाही, असं न्यायालयाने सांगितलं. SIR मुळे नागरिकत्व रद्द होतं हा याचिकाकर्त्यांचा दावा न्यायालयानं फेटाळून लावत निवडणूक प्रक्रिया ही यांत्रिक प्रक्रिया नसून मतदारयाद्यांची अचूकता आणि विश्वासार्हतेवर अवलंबून आहे, असं नमूद केलं. तसंच याआधी मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण चाळीस वर्षांपूर्वी झालं असून या दरम्यान मतदारयाद्यांमधे त्रुटी निर्माण झाल्या आहेत, त्यामुळे पुनरीक्षण प्रक्रियेची गरज आहे, हे निवडणूक आयोगाने दिलेलं कारण न्यायालयाने मान्य केलं.

दरम्यान पंढरपूर वारी आणि अतिवृष्टीच्या कालावधीत मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम न राबवण्याची मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. याचा दुसरा टप्पा 30 जून ते 29 जुलै दरम्यान होणार आहे.

**खत**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खत विक्री आराखड्यांतर्गत IFMS आणि Agristack प्रणालीचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. यासाठी FSAS हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून QR कोडद्वारे शेतकऱ्यांना खतांचे ऑनलाइन बुकिंग करता येणार आहे. बुकिंगनंतर तीन दिवसांत निवडलेल्या विक्रेत्याकडून खत खरेदी करता येईल. त्यामुळे रांगा, अनावश्यक खतांची सक्ती आणि उपलब्धतेबाबतचा गोंधळ टळणार आहे. या पथदर्शी प्रकल्पाची सुरुवात खरीप हंगामात कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात होणार आहे.

**नीट**

नीट युजी पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग-सीबीआयनं आज आणखी दोन जणांना अटक केली. लातूर इथले डॉ. मनोज शिरुरे याला आज चौकशीनंतर ताब्यात घेण्यात आलं. लातूर इथले निवृत्त प्राध्यापक पी व्ही कुलकर्णी यांच्याकडून

रसायनशास्त्र पेपरमधले प्रश्न जाणून घेतल्याचा शिरुरे याच्यावर आरोप आहे. पुण्यातल्या डॉ. अभंग प्रभू मेडिकल अकॅडमी इथले रसायनशास्त्र विषयाचा शिक्षक तेजस शहा याला देखील सीबीआयने आज अटक केली. त्याने आरोपी मनिषा हवालदार हिच्याकडून प्रश्नपत्रिका मिळवली होती. याप्रकरणी सीबीआयने आतापर्यंत 13 जणांना अटक केली आहे. दरम्यान या संपूर्ण गैरप्रकारामागे 'कॉर्पोरेट क्लासेस' आणि 'इंटिग्रेटेड कॉलेजेस'चे मोठे रॅकेट सक्रिय असावे, असा संशय 'भारत अगेन्स्ट करप्शन'चे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी व्यक्त केला. त्यामुळे सरकारने अशा पॅटर्नवर तात्काळ बंदी आणण्याची मागणी पाटील यांनी केली आहे.

**<u>मालमत्ता कर</u>**

मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी विभागाला भेट दिली. उपायुक्त सचिन पवार यांनी डिजिटल प्रणाली, जीआयएस सर्वेक्षण, महसूलवाढीच्या उपाययोजना आणि नागरिकाभिमुख सेवांची माहिती दिली. या अभ्यासभेटीतून दोन्ही महापालिकांमध्ये सर्वोत्तम प्रशासन पद्धतींची देवाणघेवाण होऊन अधिक कार्यक्षम कर व्यवस्थापनाला चालना मिळणार आहे.

**<u>एनडीए</u>**

राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या 150 व्या अभ्यासक्रमाच्या दीक्षांत संचलन सोहळ्यानिमित्त 29 मे रोजी 'सरंग' हेलिकॉप्टर पथकाकडून भव्य हवाई कसरती सादर करण्यात येणार आहेत. महिला कॅडेट्सच्या तिसऱ्या तुकडीच्या सहभागामुळे सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वदेशी 'ध्रुव' हेलिकॉप्टरद्वारे आकर्षक समूह उड्डाण आणि कौशल्यपूर्ण हवाई प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत.

**<u>नेहरू</u>**

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेस महानगरपालिकेच्यावतीने महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, विविध विभागातील कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

**<u>जनगणना</u>**

पिंपरी-चिंचवड शहरात जनगणना कर्मचारी घरभेटीद्वारे माहिती संकलनाचे काम सक्रियपणे करत आहेत. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, निवास आणि नागरी सुविधांच्या भविष्यातील नियोजनासाठी जनगणना महत्त्वाची असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केलं आहे. माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असून नागरिकांनी अचूक माहिती देऊन सहकार्य करावं, तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुण्यात आज दिवसभर आकाश मुख्यतः निरभ्र होतं. आज कमाल 38 आणि किमान 24 पूर्णांक 9 अंश सेल्सियस तापमानची नोंद करण्यात आली. उद्याही अशाच प्रकारचं हवामान राहणार असून, संध्याकाळी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**